MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Issue-40, Vol-03, Oct. to Dec. 2021

# Vidyawarta™

Peer Reviewed International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G. Gholap

14) भारतातील प्रचलित आर्थिक समस्या व उपाय
**प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल, जि.भंडारा. (म.रा.)** ||60

15) वाचन प्रेरणा दिन :– वाचनाला चालना देणारा एक अभिनव उपक्रम
**श्री. अरविंद अंबदास भगत, जि. गोंदिया** ||63

16) कल्याणकारी राज्य व विकासात्मक धोरणे–एक वास्तववादी चिंतन ...
**प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे, ता.जि.धुळे** ||67

17) स्वातंत्र्य युद्धाचे क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके
**भुषण हिम्मत हालोरे, जि. धुळे** ||71

18) प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि ऑनलाईन : अध्ययन
**डॉ.डी.के.कदम, जि. नांदेड** ||74

19) दलित एकांकिका : स्वरूप वैशिष्ट्ये
**डॉ. रवींद्र कांबळे, मुंबई** ||77

20) २००० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रण
**प्रा. डॉ. शारदा वामन मोरे, ता.जि.धुळे** ||81

21) ग्रामपंचायत महिला लोकप्रतिनिधीच्या विकासात मागासक्षेत्र अनुदान निधी ...
**गोरखनाथ पाटीलबा नजन, जि. औरंगाबाद** ||84

22) Covid–१९ आणि त्याचे विविध क्षेत्रावरील परिणाम
**प्रा. डॉ. पी. के. पाटील, भुसावळ** ||89

23) चंद्रपूर शहरातील अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांची राष्ट्रीय एकात्मता व ...
**डॉ. एस. एम. सातपुते, चंद्रपूर (म.रा.)** ||93

24) वास्तव आणि आठवणीच्या सुख दुःखाचा 'रानवा'
**डॉ. कल्याणी शेजवळ, व्रजेश्वरी** ||96

25) नवीन कृषी तंत्रज्ञान व त्याचे महत्व– विशेषतः महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राच्या संदर्भात
**डॉ. प्रविण सुरेशराव शिंगणे, जि.बुलडाणा** ||98

26) भारत व शेजारी राष्ट्रे यांचे संबंध
**सहा. प्रा. विजय डी. वाकोडे, जि. चंद्रपूर (महाराष्ट्र)** ||103

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

पृ. क्र. १८

२) चोरखणकर रा. ग., महाराष्ट्राचा स्वातंत्र्यविर पृ. क्र. ४

३) जोशी वि., श्री. पूर्नाहुती आणि वसाहत, मुंबई-१९९५, पृ. क्र. ७२

४) डॉ. वावळे अर्जुन, यांचा वासुदेव वळवंत फडके यांच्यावरील पीएच.डी. चा अप्रकाशित प्रबंध

५) स्वातंत्र्य विर सावरकर आत्मचरित्र, पृ. क्र. ४१

६) शास्त्री के. श्रीपती, वासुदेव वळवंत फडके, पृ. क्र. ८

७) जावडेकर आचार्य, आधुनिक भारत पृ. क्र. १४४

८) खोबरेकर बि.गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे - १८१८ ते १८८४, पृ. क्र. १३९

९) Sources Materials for the history of the freedom movement in India Vol. I. ७३ (१८१८-१८८५ Mub.१९५७)

१०) दै. केसरी दि. २/१/१९४०.

११) उपरोक्त-८, पृ. क्र. १४५.

१२) उपरोक्त-३, पृ. क्र. १०६.

❑❑❑

18

# प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि ऑनलाईन : अध्ययन

**डॉ.डी.के.कदम**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हु.ज.पा.महाविद्यालय, हिमातनगर, जि. नांदेड

***********

विमा योजना ही सर्वांसाठी संरक्षण कवच आहे. परंतु विमा योजना अंतर्गत वेगवेगळ्या स्वरुपात वेगवेगळ्या ठिकाणी राबविण्यात येत होत्या. ज्या ठिकाणी मानवाला जास्त भविष्याचा धोका वाटतो तेंव्हा विमा उतरविण्याचा प्रयत्न करत असतो. व्यक्तीने आपल्या भविष्याच्या सोयीसाठी विमा उतरविण्यासाठी वेगवेगळ्या कपंनी बँका यांच्याकडे विमा काढतो. LIC मध्ये मानवाने आपल्या भविष्याची काळजी म्हणून अनेक पॉलीसी उतरविली. वाहन धारकानी वाहनचे काही खरे नाही म्हणुन प्रत्येक वाहन घेतांना वाहनाचा १ ते २ वर्षाचा विमा उतरवित असतो. आता वाहनाच्या अपघाताचे प्रमाण वाढले, त्यामुळे कमीत-कमी पाच वर्षाचा विमा काढला जात आहे. ज्या वाहनारा विमा काढला जातो. तेंव्हा वाहनाच्या नुकसानाची भीती वाटत नाही. कारण विमा असल्यामुळे त्याला समाधान असते एवढेच अपणास दुर्देवानी काही झाले, तर भविष्यात आपल्या कुटूंबाला काही अडचण होऊ नये. त्यांना आपला उदरनिर्वाह होईल इततपत तरी सोयी असते. भारत देश कृषीप्रधान आहे. भारतात आजही ७०-७२% लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागांतील लोकांच्या मुख्य व्यवसाय शेती आहे. जास्तीत जास्त शेती ही मान्सून आधारित असल्यामुळे शेती चे उत्पन्न शेतकऱ्यांच्या हातात येईल इतपत कुठलाही भरवसा नाही. कधी अतिपावसामुळे अतिवृष्टीत कधी पावसा अभावी कोरडा दुष्काळ वादळे, गारपीट किड-रोगराईल, कापसावरील लाल्यारोग, केळीवर करपा, हाळदीला सोयाबीनला हुमनी या मानवनिर्मिती संकटात लाईटचा अपुरा विजपुरवठा ट्रान्सफॉर्मची नासाडी यामुळे शेतकऱ्यांना या ना त्या कारणांची आसमानी संकटाचा सामना करावा लागतो. उत्पन्नाची शाश्वती नसते. परंतु शेतकऱ्यांना शेतीसाठी विमा योजना नव्हती शेतकरी वर्गाला विमाच्या आधार असावा हा दूरदृष्टीकोन ठेवून स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी केंद्र शासनाच्यावतीने इ.स.१९८५ साली पीकविमा

योजना सुरु केली. इ.स.१९९९ मध्ये राष्ट्रीय कृषी विमा योजना National Aggricultural Issurance Scheme लागू केली. ही योजना आपतीपासून संरक्षणासी होती, परंतु सर्वपिकांचा या योजनेत समावेश नव्हता. महाराष्ट्रात खरील हंगाम इ.स. २०१६ मध्ये सर्व जिल्ह्यात पंतप्रधान पीक विमा योजना राबविण्यास सुरूवात झाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना संपूर्ण लागू केली. या योजनेला प्रधानमंत्री फसल विमा योजना असे म्हटले जाते.

आज प्रधानमंत्री पीक वीमा योजनेला व्यापक स्वरुप आले आहे. परंतु पीक वीमा ऑनलाईन करण्याची पद्धती ह चिंतनाचा विषय बनला आहे. म्हणुन प्रस्तुत शोध निबंधात प्रधानमंत्री पीक वीमा योजना आणि ऑनलाईन पद्धती शेतकज्यांची अडचण या वर प्रकाश टाकला आहे. अध्यनाची उद्दिष्टे.

१. प्रधानमंत्री पीक वीमा योजनेचा अभ्यास करणे.

२. प्रधानमंत्री पीक वीमा भरण्याच्या पद्धतीचा अभ्यास करणे.

३. प्रधानमंत्री पीक वीमा योजना आणि ऑनलाईन पद्धतीचा अभ्यास करणे.

४. प्रधानमंत्री पीक वीमा योजनेत शेतकज्यांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययासाठी तथ्य संकलन मिळवितांना प्राथमिक आणि निरिक्षण तंत्राचा अवलंब केला. द्वितीय तथ्य संकलनात संबंधित वर्तमानपत्रे शोध निबंध चर्चासत्र, इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :-**

वीमा या शब्दा बद्दल सर्वांना कमी अधिक प्रमाणात ज्ञान आहे. कारण आपणास मोठ्या आर्थिक नुकसानीत संरक्षण देते. म्हणून विमा उतरविण्यात येतो. आज प्रत्येक क्षेत्रात विमा भरण्याची पद्धती आहे. विमा तांत्रिक दृष्टीने हा जोखीम व्यवस्थापनाचा एक प्रकार आहे. जेंव्हा काहीं दुर्देवी पणाचे प्रकरण येते, तेंव्हा विमा उतरविणाऱ्याला विमा हे कवच वाटते कारण त्या परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते. शेतकज्यांना पण शेती करीत असतांना अनेक असमानी संकटांना सामोरे जावे लागते, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यांना आधार मिळावा हा व्यापक दृष्टीकोन समोर ठेवून शेतकऱ्यांसाठी पीक वीमा योजना इ.स..१९८५ मध्ये स्व.पंतप्रधान राजीव गांधी यांनी लागू केली. आज शेतकऱ्यांना पीक वीमा योजनेचा आधार वाटत आहे. त्यामुळे इ.स.२०१६ नंतर पंतप्रधान पीक वीमा योजनेस व्यापस स्वरुप प्राप्त झाले असल्याचे दिसून येते. पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना Online आणि ऑफलाईन अर्ज करता येतो. कर्जदार शेतकऱ्यांना बँके मार्फत पीक वीमा भरता येतो. ज्या शेतकऱ्यांना कर्ज नाही असे शेतकरी वीमा ऑनलाईन पद्धतीने भरतात. पीक वीमा उत्पन्नातील घट होते तेंव्हा नुकसान भरपाई म्हणुन मर्यादित स्वरुपात नाही जेंव्हा पीक शेतात उभे असतांना किंवा पीक काढणी नंतर पीकाचे नुकसान चक्री वादळ, भुसंकलन, विगर मोसमी पाऊस, नैसर्गीक आपत्ती पिकावरील रोगराई, (किड) यासारख्या परिस्थितीत शेतकऱ्यांना संरक्षण व नुकसान भरपाई मिळावी यासाठी ह्या योजनेचे स्वरुप व्यापक आहे.

**पीक विमा योजनेचा उद्देश :-**

१. पंतप्रधान पीक विमा योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती किटक आणि रोगराई यामुळे पिकांचे नुकसान झाल्या शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळवून आर्थिक आधार प्राप्त करून देणे.

२. आज शेती खर्चीक पद्धतीने झाली आहे. शेतकरी वर्गाने नवीन-अधुनिक शेती पद्धतीचा स्वीकार करावा यासाठी त्यांना प्रेरित करणे.

३. शेती करणे आज कोणासही परवडणारे नाही तेंव्हा शेतकरी आत्महत्या करतात तर अनेक शेती सोडून कोणता तरी व्यवसाय स्विकार करतात. शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करून शेतीमध्ये टिकुन राहण्यासाठी हा एक उद्देश आहे.

४. कृषी क्षेत्राला पुरवठा करणे, अन्न सुरक्षा लाभ, शेती व्यवसायाला स्पर्धात्मक स्वरुप देवून कृषी तंत्राचा वाढ होईल.

पीक वीमा योजना खरीप आणि रब्बी हंगामासाठी लागु आहे. पीक विमा भरण्यासाठी प्रात्साहीत करण्यासाठी आर्थिक संरक्षण प्राप्त करून देण्यासाठी असली तरी या योजनेत काही उणीवा आहेत यातील सर्वात मोठी उणीव या अडचण किंवा समस्या हे पंतप्रधान पीक विमा योजनेची ऑनलाईन पद्धत आहे.

**पिक विमा भरण्याची ऑनलाईन पद्धत :-**

शेतकऱ्यांना आज आनलाईन पद्धतीने पीक वीमा भरण्याचे ज्ञान ग्रामीण भागात शेतकऱ्या पर्यंत पोहचले नाहीत. आज महाराष्ट्रातील शेतकज्यांना वीमा इफको टोकीयो (Iffco-Tokio) या कंपनी मार्फत भरला जातो. भारतीय शेतकरकी खत सहकारी इफको टोकियो मरिन ग्रुप यांच्यातील संयुक्त उपक्रम म्हणुन इफको टोकीयो यांच्या मार्फत जनरल इन्शुरन्सचा २००० मध्ये समावेश करण्यात आला. आज महाराष्ट्रात याच कंपनीमार्फत पीक विमा भरला जातो जुलै २०२१ मध्ये शेतकज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तेंव्हा या कंपनीकडे शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांनी पीक वीमा भरलेली पावती ऑनलाईन

करा असा जिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी आदेश काढला त्यात ७२ तासांची अट घातली ऑनलाईन करण्याची लिंक दिली ती लिंक supportagri@iffcotokio.co.in या द्वारे ज्या शेतकऱ्यांनी वीमा भरलेला आहे. अशा शेतकऱ्यांनी मेल द्वारे पावती ऑनलाईन करा किंवा टोल फ्री क्रमांकावर आपली तक्रार नोंदवा म्हणुन १८००१०३५४९० हा टोल फ्री क्रमांक दिला ज्यांनी ऑनलाईन केले नाही. ऑनलाईन होत नसेल तर तालुक्याच्या ठिकाणी कृषी कार्यालयात पिक वीमा कंपनी प्रतिनीधी यांच्याकडे पीक नुकसानीचा ऑफलाईन अर्ज द्यावा त्याच बरोबर शेतकऱ्याच्या संबंधीत तलाठी, मंडळाधिकारी, कृषी पर्यवेक्षक, ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी यांना कळवावे परंतु शेतकरी अनेक समस्यांना समोरे जातांना दिसून येतात. प्रत्येक मुद्दाचा प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे अध्ययन केले.

शेतकऱ्यांना ऑनलाईन करण्याचे ज्ञान नाही. तेंव्हा शेतकरी अनेक मोबाईल धारकांचा आधार घेतो, परंतु प्रत्येकाच्या मोबाईल सर्व्हर डाऊन आहे असे येते. तेंव्हा शेतकरी आपली पावती ऑनलाईन होत नाही. तेंव्हा शेतकरी दुसऱ्यां शेतकऱ्यांना विचारतो तुमची पावती ऑनलाईन झाली का ? यावरून असे दिसून येते की, शेतकरी हा घावरलेला, चिंताग्रस्त बनलेला असतो. शेतकरी जेंव्हा टोल फ्री क्रमांक डायल करतो तेंव्हा शेतकऱ्याला एवढी लांब लचक माहिती दिली जाते तेंव्हा शेतकऱ्याला काहीही समजत नाही. आदेशामध्ये मात्र आपल्या नुकसानीची माहिती टोल फ्रि क्रमांकावर सांगा, तेंव्हा शेतकऱ्यांना कळत नाही एवढेच नाही तर सुशिक्षीत लोकांनाही काही समजत नाही, काही मुलांना प्रयत्न करून ऑनलाईन केले तर Types of Product यात १. standing crop २. Cutting crop असे दोन प्रकार काही जणांना समजत नाही म्हणजेन टोल फ्रि क्रमांक शेतकऱ्यांच्या उपयोगाचा नाही. अशा वेळी शेतकरी वेगवेगळे मार्ग शोधतो इ-सुविधा केंद्रात जावुन आपली विमा पावती ऑनलाईन करतो तेथे ऑनलाईन ई-सुविधा केंद्रात भाव ठरलेले नसतात. ७२ तासाचा वेळ असल्यामुळे शेतकज्यांची गर्दी होते तेंव्हा शेतकज्यांची पीक वीमा पावती ऑनलाईन करण्यासाठी ५० रु., १०० रु., १५० रु. तर कुठे यापेक्षाही जास्त पैसा घेतात ही शेतकऱ्यांची पिळवणुक आहे असे स्पष्ट दिसुन येते, यावरून हे स्पष्ट होते कि, ई-पीक ॲप शेतकऱ्यांच्या डोक्याला ताप अशी अवस्था झाली आहे. गरीबांकडे मोबाईलचा आभाव आजही ॲण्ड्रॉइड मोबाईल १० टक्के शेकज्यांकडे आहेत. परंतु शेतात जा, मोबाईल काढा, त्यावरील इ-पीक पाहणी ॲप डाऊनलोड करा त्यात माहिती भरा सुरूवातील चार अंकी ओटीपी कायमचा लक्षात ठेवा परंतु अनेक शेकज्यांची शेती डोंगराळ अति दुर्गम भागात आहे. त्याठिकाणी नेटवर्क येत नाही. त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडे त्यांच्या कुटूंबातील तरुण वर्गाकडे ॲण्ड्राईड मोबाईल आहेत. ग्रामीण भागात सुविधा केंद्र आहेत. आज वरवर पहाता सर्वांना वाटते पिक वीमा पीक विम्याचे नुकसान हे मोबाईल वरून करता येते, परंतु पीक विमा मोबाईलवर कंपनीकडे भरण्यासाठी शेतकऱ्याच्या कुटूंबातील तरूण वर्गाचे बँक खाते नाहीत. काही जणांच्यां बँक खात्यावर पैसे नसतात कोणाचे व्याजाने, उसने काही दिवसांनी येणाऱ्या पैशाच्या भरोशावर विमा भरण्याचे नियोजन करतात. काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर पैसे असतात परंतू बँक खाते मोबाईल लींक नसल्याचे दिसून आले. जेंव्हा शेतकऱ्याचे बँक खाते, आधार लिंक, मोबाईल नंबर लिंक नसतो तेंव्हा मात्र शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने मोबाईल वरून काहीच करता येत नाही. म्हणुन ऑनलाईन पद्धती कुचकामी ठरते.

काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर बँक बॅलेंस असते मोबाईल नंबर बँक खात्याशी लिंक असतो आधार नंबर लिंक असतो. पण शेतऱ्यांनी जो पीकाचा पीक विमा काढला त्याची पावती काढण्याची सुविधा नसते. मग पावती ही विमा भरल्यावर अतीशय महत्वाची असते. पावतीसाठी जेंव्हा इतर ठिकाणी प्रिंटर असते ते लोक पावती लवकर देत नाहीत. हातावर काम आहे. पीक विमा भरतांना गर्दी असते. पावती कोणी देत नाही लाईट नाही. ज्यातीत जास्त शेतकऱ्यांचा मोबाईलवर पीक वीमा भरण्यावर विश्वास नसतो आणि मुलांनी काही केले म्हणुन तो सुविधा केंद्राचा आधार घेत असल्याचे दिसुन येते.

शेतकरी तलाठी यांच्याकडे जातो तेंव्हा त्यांना कृषी अधिकाऱ्याकडे जा म्हणुन सांगतात. कृषी अधिकारी हा ग्रामसेवकाचे नांव सांगुन मोकळा होतो. ग्राम सेवक हा गावातील रोजगार सेवकाकडे जा म्हणतो तर रोजगारसेवक विमा कंपनी प्रतीनिधीकडे जा तर विमा कंपनी प्रतीनिधी शेतकऱ्यांना भेटत नाही. अशी दैनिय आवस्था शेतकज्यांची झाली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महसुल सर्व विभागाचे कर्मचारी शहरातून अप-डाऊन करतात कर्मचारी यांना फोन केला तर येत आहे म्हणतात ज्यास्त माहिती विचारली तर प्रवासात आहे आवाज येत नाही म्हणुन फोन बंद करता हे वास्तव चित्र आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, ऑनलाईन पिक वीमा नुकसानीची नोंद करणे शेतकज्यांची अतिशय गंभीर स्वरुपाची समस्या बनली आहे. ऑनलाईन करून आदेश काढणे वास्तवात ऑनलाईन करणे हे बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे पीकाचे झालेले नुकसान यात नांदेड जिल्ह्यातील दिलीप पवार आणि जालना जिल्ह्यातील लक्ष्मण यांनी विष प्राषण करून आत्महत्या केली.

पिक वीमा योजना ही अतिशय चांगली शेतकऱ्यांना चांगली

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Oct. To Dec. 2021
Issue-40, Vol-03


असून शेतकऱ्यांच्या पीक नुककसानीचे कवच ठरते, परंतू पीक वीमा योजनेची अमलबजावणी व्यवस्थीत पद्धतीने होणे गरजेचे आहे. तेंव्हा शेतकरी आपल्या पिकाचा तलाठी यांच्या पेरा प्रमाणपत्रानुसार विमा भरतो पावती घेतो, मग पीकाचे नुकसान झाल्यावर ऑनलाईन करावयास लावणे चुकीचे आहे. जेंव्हा इतर क्षेत्रात वीमा उतरवला जातो तेंव्हा वीमा धारक कंपनीला घटना कळवतो तेंव्हा कंपनी प्रतिनीधी येवुन पंचनामा करून नुकसान भरपाई देतात त्या प्रमाणे शेतकऱ्याच्या शेतात येवुन पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी विमा भरून घेण्याची जबाबदारी ही शासकीय यंत्रणेमार्फत झाली पाहीजे. विमा कंपनी प्रतिनीधी आणि महसुल विभाग यांचा समन्वय ठेवून ऑनलाईन करण्याची पद्धतीची जबाबदारी कंपनी प्रतिनीधी, तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, कृषि सहाय्यक, रोजगार सेवक यांच्या मार्फत व्हावी. तेंव्हा शेतकऱ्यांची पंतप्रधान पीक वीमा योजना नक्कीच फलदायी ठरते.

**संदर्भ :-**

१. प्रत्यक्ष मुलाखत व निरीक्षण तंत्राचा उपयोग
२. Mr. mikipedia.org
३. २७ जुलै २०२१ जिल्हाधिकारी नांदेड यांचे आदेश.
४. ११ सप्टेंबर २०२१ दैनिक लोकमत
५. १४ सप्टेंबर दैनिक लोकसत्ता

❑❑❑

19

# दलित एकांकिका : स्वरूप वैशिष्ट्ये

**डॉ. रवींद्र कांबळे**
मराठी विभाग,
श्री एम डी शाह महिला महाविद्यालय मालाड प मुंबई

**********

मराठी एकांकिकेचा विचार करत असताना इ स १६३० ते १६५५ या काळातील एकांकिका आणि १६५५ नंतरच्या आधुनिक एकांकिका असे दोन टप्पे करता येतील. एकांकिकेच्या प्रवाहाला १६५५ मध्ये एक वेगळे वळण मिळाले त्यामुळे आशय व तंत्र यादृष्टीने ती अधिकच सक्षम झालेली दिसून येते. महाराष्ट्राच्या रंगभूमीवर फार्सच्या स्वरूपात एकांकिका आलेली दिसते. या फार्सची प्रेरणा इंग्रजी रंगभूमीवरून घेतलेली आहे. मराठीत एकांकिका रंगभूमीवर येण्यापूर्वी ती करमणूक, मनोरंजन, रंगभूमी, नाट्यकथार्णव, विविध ज्ञान विस्तार इ. अशा लोकप्रिय मासिकातून एकांकिका अधून मधून प्रसिद्ध होत होती. तिचे नाट्यप्रयोग ही झाले पण म्हणावे तितके यश मिळाले नाही. पण १६२८ मध्ये र.गो. टेबे यांच्या आठवणींचे खंदक या एकांकिकेस मात्र प्रसिद्धी मिळाली.

१६४५ नंतर साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलू लागला. कथा,कांदबरी, कविता, नाटक याच्या लेखनामध्ये आमूलाग्र बदल होऊ लागला. कथेच्या क्षेत्रात नव कथा आली आणि त्यातून नवनवीन अनुभव विश्व् व्यक्त होऊ लागले. रोजचे ताण तणाव, समाजातील राजकीय व सामाजिक बदल, नवी यंत्र संस्कृती, मानसिक घडामोडी इ. अशा अनेक गोष्टींचे चित्रण नवोदित लेखक मांडण्यात यशस्वी होऊ लागले. हे जे जीवनानुभव नव कथेला सापडले अगदी तसेच अनुभव एकांकीने जवळ केले. त्यामुळे एकांकिकेतून सर्वच विषय व्यक्त होऊ लागले. कधी कधी काही अनुभव नाटकातून उत्कृष्टपणे, तीव्रतेने व्यक्त होऊ